# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण तसेच सिडको यांच्या नियम व कायद्यांमध्ये विसंगती असल्याबाबत**

**(१) ३३७९ (२३-१२-२०१४). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना सन १९७२ मध्ये झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोची स्थापना (मुंबई) सन १९७२ मध्ये झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दोन्ही संस्था महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ या एकाच अधिनियमांतर्गत नवीन शहर वसवण्याच्या कामासाठी शासनाने स्थापित केल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिडकोसाठी १२.५% परतावा जमिनीचे धोरण आणि प्राधिकरणासाठी असलेल्या १२.५ % परतावा जमिनीचे धोरण यात विसंगती आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील दोन्ही प्राधिकरणे ही शासन नियंत्रित असूनही दोन्ही संस्थांमधील असलेले नियम आणि कायदे सारखे नसण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, शासनाने एकाच उद्देशासाठी व एकाच अधिनियमांतर्गत निर्मित केलेल्या दोन संस्थांमध्ये वेगवेगळे नियम/धोरण राबविल्यामुळे सर्वसामान्यांची दिशाभूल होत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ या अधिनियमांतर्गत पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना सन १९७२ मध्ये झालेली असून सिडकोची स्थापना दिनांक १७.०३.१९७० रोजी झालेली आहे. तसेच मार्च, १९७१ मध्ये मुंबईस पर्यायी शहर विकसित करण्यासाठी नवीन शहर विकास प्राधिकरण म्हणून सिडकोची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४), (५) व (६) मुंबईमध्ये येणारा जनप्रवाह अन्यत्र वळविण्यासाठी पर्यायी शहराची निर्मिती करणे, राज्याच्या उद्योग धोरणाला अनुसरुन उद्योगाचा समतोल विकास साधण्यासाठी पोषक वातावरणाची निर्मिती करणे, वर्तमान तसेच भविष्यातही नागरिकांच्या गरजांची पूर्तता करु शकेल अशा पायाभूत-भौतिक सोयी सुविधांनी परिपूर्ण आदर्श नगराची निर्मिती करणे, हे सिडकोचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

तसेच पिंपरी चिंचवड शहराजवळील औद्योगिक क्षेत्रानजिक सुनियोजित शहर वसविण्यासाठी जमिन विकसित करणे तसेच पायाभूत सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना झालेली आहे.

उपरोक्त दोन्ही प्राधिकरणांची स्थापना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ या अधिनियमांतर्गत झालेली असून सदर अधिनियमातील तरतूदींस अनुसरून दोन्ही प्राधिकरणांची धोरणे व नियम निश्चित करण्यात आलेले आहेत.

---

## मुंबईमधील धोकादायक इमारत पुनर्बांधणीच्या नव्या धोरणाला रहिवाशांनी केलेला विरोध

**(२) ६९३३९ (१६-०१-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपलिकेने बृहन्मुंबईतील एकूण ६८२ इमारती व म्हाडानी ११ इमारती धोकादायक म्हणून जाहिर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास मार्गी लागण्याकरीता धोकादायक म्हणून घोषित केल्यानंतर इमारतींची पूनर्बांधणी सहा महिन्याच्या मुदतीत करण्याबरोबरच पुनर्विकासाकरीता ७० टक्के रहिवाश्यांच्या मान्यतेची अट रद्द करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धोरणामुळे बांधकाम व्यावसायकांचे हित साधले जाण्याची शक्यता असुन इमारतीतील ७० टक्के रहिवाश्यांना विचारात न घेतल्याने इमारत मालक व बांधकाम व्यावसायिक परस्पर संगनमत करुन जागेचे व्यवहार शकणार असल्याने इमारतीमधील रहिवाश्यांनी गेली वर्षभर सातत्याने शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०७-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने सादर केलेल्या अहवालानुसार मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर विभागात सुमारे ९३ इमारती हया सी-१ वर्गवारी मध्ये घोषित केल्या आहेत. तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सन २०१८ च्या पावसाळ्यापूर्वी केलेल्या खाजगी उपकरप्राप्त इमारतींपैकी ०७ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

(२) नाही.

तथापि, नगरविकास विभागाच्या, विकास प्रारुप आराखडा-२०३४ अन्वये पुनर्विकासासाठी ७०% ऐवजी ५१% टक्के रहिवाश्यांच्या मान्यतेची अट घालण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई सिडकोने जमिनी संपादित करताना गावठाण विस्ताराबाबत निश्चित धोरण ठरविले नसल्याबाबत

**(३) ७५४३३ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई सिडकोने गत अनेक वर्षापूर्वी विविध विकास कामांच्या नावाखाली गावठाण विस्ताराबाबत निश्चित धोरण ठरविले नसल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाची गावठाण विस्ताराबाबत निश्चित भूमीका काय आहे व शासनाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१९) :** (१) अशी बाब नाही.
(२) सिडको महामंडळाने नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासासाठी संपादित जमिनीच्या प्रकल्पग्रस्तांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने दि.०६.०३.१९९० व दि.२८.१०.१९९४ च्या शासन निर्णयान्वये १२.५% योजना मंजूर करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत ८०% प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंडांचे वाटप करण्यात आलेले असून सदर जमिनीवर विकास प्रकल्प राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.

गावठाण व गावठाण विस्तारित क्षेत्रामधील प्रकल्पग्रस्तांचे बांधकाम नियमितीकरणासह नियोजनबद्ध विकास हा समूह विकास योजनेच्या माध्यमातून प्रस्तावित आहे. समूह विकास योजना (cluster scheme) राबविण्याच्या अनुषंगाने सूचना व हरकतीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वेये दि.०४/०३/२०१४ रोजी सूचना प्रसिद्ध करण्यात आली असून याबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण झाली आहे. याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्रमांक ६१/२०१४, दिनांक ९ जून, २०१७ रोजी निकाली काढल्याने या संदर्भातील न्यायालयाचा अंतिम निर्णय घेण्यास असलेला प्रतिबंध राहिलेला नाही. सबब, यासंदर्भात अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन असून नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाचे संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत सर्व्हेक्षण करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदलापुर (जि.ठाणे) येथील बीएसयुपी योजनेतील सदनिकांचे गत ५ वर्षापासून वाटप झाले नसल्याबाबत**

**(४) ८९५५९ (०१-०९-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापुर (जि.ठाणे) येथील बीएसयुपी योजनेतील १६१४ सदनिका गत ५ वर्षापासून लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले नाही ही बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाकडुन अद्यापर्यंत पात्र लाभार्थ्यांची सुची तयार करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतील ५० सदनिकांवर अवैध घुसखोरांनी कब्जा केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर योजनेच्या लाभार्थ्यांना सदनिका मिळण्यास विलंब करण्याऱ्या अधिकाऱ्यावंर महानगरपालिकेने कारवाई केली आहे काय तसेच नगरविकास विभागाने सदर प्रकरणी दखल घेतली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१९) :** (१) व (२) कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या अहवालानुसार बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत नगरपरिषद क्षेत्रात एकूण ९०४ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले आहे.

• मात्र सदर योजना प्रत्यक्षात राबविताना झालेला लाभार्थ्यांच्या तीव्र विरोध, त्यामुळे निर्माण झालेली जागेची अडचण व जागेत बदल या कारणांमुळे लाभार्थ्यांची यादी अंतिम होऊ शकली नसल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

(३) नगरपरिषद हद्दीतील रस्ते रुंदीकरणाची कामे करताना विस्थापित होणाऱ्या लाभार्थ्यांकरीता संक्रमण शिबीराची सोय उपलब्ध नसल्याने नगरपरिषदेमार्फत विस्थापित लाभार्थ्यांची बैठक घेऊन त्यामध्ये पात्र होऊ शकणाऱ्या २७८ लाभार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात घरकुले ताब्यात देण्यात आली असल्याची बाब नगरपरिषदेच्या अहवालात नमूद आहे.

(४) व (५) सदर योजनेंतर्गत ३७४ लाभार्थ्यांची निवडयादी अंतिम करण्यात आली असून सदर लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट, २०१९ अखेर घरकुले वाटप करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

• केंद्र शासनाने दि.६/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्पातील उर्वरित घरकुलांचे वाटप प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र होणाऱ्या लाभार्थ्यास करण्यात येणार असल्याची बाब नगरपरिषदेने कळविली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ऐरोली ते कळवा (जि.ठाणे) या रेल्वे मार्गाच्या भूसंपादनासाठी सर्वे करण्याबाबत

**(५) ९१९१० (१९-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली ते कळवा (जि.ठाणे) या रेल्वे मार्गाचे मा.पंतप्रधान यांचे हस्ते माहे डिसेंबर, २०१६ मध्ये भूमिपुजन झाले असून सुद्धा सदर मार्गाच्या भूसंपादनासाठीचा जिल्हाधिकारी, ठाणे एमएमआरडीए व रेल्वे यांचा एकत्रित सर्वे अद्यापी झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेल्वे मार्गासाठी शासनातर्फे निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा एकत्रित सर्वे न होण्याची कारणे काय आहेत व सदर सर्वे केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१९) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी संयुक्त मोजणीची कार्यवाही चालू असतांना मौजे-कळवा येथील स्थानिक नागरीकांनी संयुक्त मोजणीस दोन वेळा विरोध केल्याने मोजणीची कार्यवाही प्रलंबित आहे. सदर विषयाबाबत मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७.०६.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्याच प्रमाणे पुढील बैठक उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे कार्यालयात दिनांक १३.०९.२०१७ रोजी घेणेत आली. संयुक्त मोजणीची कार्यवाही पुर्ण होताच दिनांक १२.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

---

### पनवेल शहरातील मराठी शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) १२६४२७ (०६-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहरातील मराठी शाळांमध्ये गत वर्षभरापासून इंटरनेट सुविधा बंद असून शाळेतील शिक्षकांना शिक्षणाबाबतच्या नवनवीन योजनांची माहिती मिळविणे कठीण होत असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत घसरण होत असून या शाळांना इंटरनेट सुविधेसह शालेय साहित्य मागविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा याबाबतचे लेखी निवेदन आयुक्त श्री.गणेश देशमुख यांना दिनांक २ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१९) :** (१) मोठा खांदा येथील शाळा क्र.५ मधील संगणक कक्ष व ग्रंथालय बंद न करण्याबाबत ग्रामस्थांनी दिनांक १४.०९.२०१८ रोजी आयुक्तांना निवेदन दिले हे खरे आहे.

परंतु, सदर निवेदनामध्ये पनवेल शहरातील मराठी शाळांमधील इंटरनेट सुविधा वर्षभरापासून बंद असल्याने शाळेतील शिक्षकांना शिक्षणाबाबत नवनवीन योजनांची माहिती मिळत नसल्याचा कोणताही उल्लेख नसल्याची बाब सदर निवेदनात नमुद नाही.

तसेच पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्र.५ मध्ये इंटरनेट सुविधेसह संगणक संच उपलब्ध असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने नमुद केली आहे.

(२) व (३) पनवेल शहरामधील महानगरपालिकेच्या शाळांमध्ये संगणक व नेट सुविधा बाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

• पनवेल शहरामध्ये महानगरपालिका संचलित एकूण ८ मराठी शाळांमध्ये संगणक सुविधा उपलब्ध आहे. तसेच यापैकी ५ शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

• उर्वरित ३ शाळांमध्ये सुध्दा इंटरनेट सुविधा देण्याचे प्रस्तावित आहे.

---

### मुंबई मधील गिरगाव चौपाटी येथे लोकमान्य टिळक यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(७) १२७०३४ (०४-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील गिरगाव चौपाटी येथे लोकमान्य टिळक यांचा पुतळा असलेल्या ठिकाणी कायमस्वरूपी ध्वजस्तंभ, मोठी कमान व संग्रहालय यांचा समावेश असलेले स्मारक उभारण्याची टिळक स्मारक समितीने मागणी केली असून गत ६ वर्षांपासून प्रयत्न करूनही स्मारक उभारण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरगाव चौपाटीवर ब्रिटीश काळापासून वास्तव्यास असलेल्या आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करणा-या गिरगाव चौपाटीवरील कोळीवाड्यातील कोळी बांधवांवर बेघर होण्याची वेळ ओढवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६ मार्च, २००१ रोजी या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले असतांनाही आजतागायत या कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आलेले नसून जिल्हाधिकारी कार्यालयाने नोटीसा बजावून झोपड्या हटविण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गिरगाव येथील कोळीवाड्यातील कोळी बांधवांचे पुनर्वसन करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत व जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या नोटीसा रद्द करुन त्यांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) असल्यास, उच्च न्यायालयाने नेमलेल्या उच्चस्तरीय समितीकडे व महानगरपालिकेकडे या स्मारकाच्या प्रस्तावाचा प्रश्न सोपविण्यात आला असून टिळक स्मारक समितीने केलेल्या मागणी नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१९) :** (१) गिरगांव चौपाटी येथे लोकमान्य टिळक यांचा पुतळा असलेल्या ठिकाणी कायमस्वरुपी ध्वजस्तंभ, मोठी कमान व संग्रहालय यांचा समावेश असलेले स्मारक उभारण्याची मागणी टिळक स्मारक समितीने केली आहे हे खरे आहे.

तथापि, मा.उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०३.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये, लोकमान्य टिळक गार्डनमधील समाधीसमोर लोकमान्य टिळक जयंती व पुण्यतिथी तसेच, प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रध्वज फडकविण्यास संमती दर्शविलेली आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्रमांक १९६३/२००० व २१९७/२०१८ मध्ये दिनांक २१.०६.२०१८ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन, सदर प्रकरणी देण्यात आलेल्या सुनावणीत झोपडीधारक अपात्र ठरल्याने त्यांचे निष्कासन करण्यात आल्याचे महसुल विभागाकडून प्राप्त माहितीत नमूद करण्यात आले आहे.
(४), (५) व (६) मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने सदर स्मारकास परवानगी दिली नसून, टिळक स्मारक समितीने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक १९६३/२००० व २१९७/१९९८ ची पुढील सुनावणी दिनांक २२.१०.२०१९ रोजी ठेवण्यात आल्याचे महसुल विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

---

## माथाडी कामगारांप्रमाणेच शिक्षकांनाही मुंबई, ठाणे, नवी मुंबई, परिसरातील पंतप्रधान आवास योजनेतील घरे देण्याबाबत

**(८) १३०१५१ (०७-१२-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथाडी कामगारांसाठी नवी मुंबईत सिडको निर्माण करीत असलेल्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ५ हजार घरे देण्यात येणार असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी कामगार मेळाव्यात केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माथाडी कामगारांप्रमाणेच मुंबई, ठाणे, नवी मुंबई, परिसरातील शिक्षकांनाही पंतप्रधान आवास योजनेतील घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१९) :** (१) व (२) सिडको महामंडळाच्या सन २०१८ व २०१९ च्या महागृहनिर्माण योजनेमध्ये एकूण १४,८३८ घरांचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये

माथाडी कामगारांकरीता ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. यामध्ये अल्प उत्पन्न गटाकरीता ४७८ सदनिका व आर्थिक दृष्टया दुर्बल गटाकरीता २६३ सदनिका अशी एकूण ७४१ सदनिका माथाडी कामगारांकरीता आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. याअनुषंगाने सध्या वाटपपत्र देण्याचे काम प्रगती पथावर आहे.

माथाडी कामगारांप्रमाणे शिक्षकांनाही पंतप्रधान आवास योजनेतील घरे देण्याची बाब सिडको महामंडळाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई हद्दीतील गोराई आणि मनोरी खाडीवर प्रस्तावित असलेल्या पुल प्रकल्पास भूमिपूत्रांचा विरोध असल्याबाबत**

**(९) १३४९२१ (११-०७-२०१९). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई हद्दीतील गोराई आणि मनोरी खाडीवर एमएमआरडीएने पर्यटनावर आधारीत विकास आराखड्यात पुल प्रस्तावित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलास तेथील भूमिपूत्रांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलास भुमिपूत्रांचा विरोध असण्याची कारणे काय आहेत व त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्पास स्थानिक लोकांचा व भुमिपुत्रांचा विरोध होण्याची सर्वसाधारण कारणे पर्यावरण, संस्कृती परंपरा, व्यवसाय अबाधित राहणे व कोळीवाडयाचे अस्तित्व टिकून राहणे इत्यादी आहेत. सदर कामास होणारा विरोध असण्याची कारणे जाणून घेण्याकरीता व स्थानिक रहिवाश्यांना पुलाची आवश्यकता समजविण्याकरीता स्थानिक संघटनेच्या प्रतिनिधी सोबत प्राधिकरणाने महानगर आयुक्त, मुख्य अभियंता, सह महानगर आयुक्त यांच्या स्तरावर वेळोवेळी बैठका घेतल्या आहेत.

मनोरी येथील खाडीपुलास स्थानिकांचा जोरदार विरोध असल्यामुळे सदर काम स्थगित करण्यात आले आहे. गोराई खाडीपुल व पोहोच रस्त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया तसेच वनप्रस्ताव व इतर परवानग्या घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**'संजय गांधी राष्ट्रीय उद्याना' मधील आदिवासींचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१०) १३४९६० (०९-०७-२०१९). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने, बोरिवली (मुंबई) 'संजय गांधी राष्ट्रीय उद्याना' मधील २६,९५९ पात्र आदिवासी अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्याकरिता आरे वसाहतीतील मरोळ, मरोशी भागातील पुनर्वसन प्रकल्पाचे काम सुरु करण्याचे आदेश देण्यात येऊनही अद्याप सदरहू प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त २७ हजार कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०८-२०१९) :** (१) होय.

म्हाडाच्या अहवालानुसार, मुंबई मंडळाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील २००० आदिवासी व २४९५९ पात्र अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार अशा निविदा बोलविल्या आहेत हे खरे आहे. कंत्राटदाराची नियुक्ती करणे, कार्यादेश देणे यासंदर्भात म्हाडाकडे कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेत आमदार स्थानिक विकास निधीअंतर्गत कामांना मंजूरी देतांना अडवणूक करण्यात येत असल्याबाबत**

**(११) १३४९९७ (११-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेअंतर्गत मंजुरी देतांना महानगरपालिकेच्या महासभेचा ठराव असतांना नाशिक मध्य विधानसभा मतदार संघातील कामांसाठी नव्याने ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करून अडवणूक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत १५ दिवसात ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास प्राप्त असल्याचे समजून मंजूरी देण्याचा शासन निर्णय असतांना अडवणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत कामांना मंजूरी देतांना अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिका सक्षम प्राधिकरण असल्याने, महानगरपालिका हद्दीमध्ये महानगर-पालिकेमार्फत काम करण्यास महासभा ठरावा-व्यतिरिक्त इतर वेगळ्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.
(२) व (३) महानगरपालिका हद्दीत महानगरपालिका व्यतिरिक्त इतर विभागामार्फत काम करण्यात येणार असल्यास, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सर्व समावेशक मार्गदर्शक तत्वानुसार, अनुज्ञेय वापर, जागेची मालकी व सदर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्याचे पुढील परिरक्षण करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यास विहित मुदतीत ना-हरकत दाखले देण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डी.एन.नगर-मंडाले मेट्रो २- बी प्रकल्पाबाबत**

**(१२) १३५०९७ (११-०७-२०१९). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डी.एन.नगर-मंडाले मेट्रो २-बी प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे,
(२) असल्यास, या प्रकल्पामुळे प्रकल्प बाधित होणाऱ्या कुर्ला (पूर्व) नेहरू नगर येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी व्हावे या अनुषंगाने मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन व म्हाडा यांच्यामध्ये करार करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, किती कालावधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करून मेट्रो २ बी चे काम पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) मेट्रो-२ ब या प्रकल्पास २५ ऑक्टोर, २०१६ रोजी मान्यता देण्यात आली असून,मे. एआयसीए कन्सोरटियम या संस्थेची साधारण सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, मे. सिस्त्रा एमव्हीए कन्सल्टींग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या सल्लागाराची सविस्तर संकल्पचित्र सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सदर प्रकल्पाची चार भागामध्ये विभागणी करण्यात आली असून एकूण रु. २,४५० कोटींच्या कामांकरीता कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली असून सध्या स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) सदर प्रकल्पाने बाधित झालेल्या सोसायट्यांचे पुनर्वसन करण्यासंदर्भाम म्हाडा सोबत दिनांक १३.११.२०१८ रोजी चर्चा होऊन, मेट्रो मार्गाच्या प्रस्तावित बांधकामानंतर भूखंडाच्या

उर्वरित जागेत त्याच ठिकाणी मु.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत पुनर्वसन करण्याचे ठरविण्यात आले आहे. प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्राज्ञांमार्फत बाधित तीन सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत दोन नमुन्यात आराखडा तयार केला असून तो दि.११.१.२०१९ रोजी म्हाडाकडे मान्यतेसाठी सादर केला. प्राधिकरणाने सादर केलेल्या दोन नमून्यापैकी एका नमुन्यास म्हाडाने ठराव क्र. ६८३४ अन्वये मान्यता दिली आहे. म्हाडाने मान्यता दिलेल्या ठरावाप्रमाणे सविस्तर प्रस्ताव म्हाडाकडे सादर करण्याबाबत म्हाडाने प्राधिकरणास दिनांक २२.०४.२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्रज्ञांमार्फत सदर पुनर्विकास आराखड्याचे सविस्तर प्रस्ताव करण्याचे काम सुरु असून, सदर पुनर्विकास आराखडा लवकरच म्हाडाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो मार्गिका २ ब (डी.एन. नगर-मंडाले) या मार्गिकेचे बांधकाम युध्दपातळीवर सुरु असून ते २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रयत्न आहेत. कुर्ला (पुर्व) नेहरु नगर येथील मेट्रो प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन हा मेट्रो प्रकल्पाचाच एक भाग असून, मेट्रो प्रकल्प पुर्णत्वाच्या अगोदर सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्याचे नियोजित आहे.

---

**नाशिक महानगरपालिकेअंतर्गत पंडित कॉलनी येथील रस्ता खचल्याबाबत**

**(१३) १३५३१४ (११-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत पंडित कॉलनी येथील रस्ता खचल्याची दुर्घटना दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याचे काम १ माहिन्यापूर्वी करण्यात आले असून व दोन दिवसांपूर्वी सदर रस्त्याची डागडुजी करण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार एकच रस्त्याच्या दुरूस्तीसाठी निधी देण्याची कोणती कारणे आहेत,

(४) असल्यास, पंडित कॉलनी येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत संबंधित ठेकेदार, अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई कारण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१९) :** (१) होय.

नाशिक महानगरपालिका हद्दीतील पंडीत कॉलनी येथील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पुर्ण झाल्यानंतर, ड्रेनेज लाईनचे चेंबर व पाणीपुरवठा लाईन लिकेज झाल्याने रस्त्याखालील माती भिजून खचल्यामुळे दि.१२/०३/२०१९ रोजी रस्त्यावर छोटा खड्डा पडला होता.

(२) नाही.

सदर रस्त्याचे डांबरीकरण जानेवारी २०१९ मध्ये पुर्ण करण्यात आले होते. मात्र रस्ता खचण्याच्या दोन दिवसांपुर्वी कुठलीही डागडुजी करण्यात आलेली नव्हती.

(३) व (४) वारंवार एकाच रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यात आलेला नाही. तसेच, पंडित कॉलनी येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे आढळून आलेले नाही, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिका येथील अतिरिक्त कारभार असणाऱ्या आयुक्तांनी पदाचा गैरवापर करून २१ कोटी रुपयांची नुकसान भरपाई दिल्याबाबत**

**(१४) १३५३१६ (११-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिका येथे आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार असतांना उपअभियंता यांच्याकडे कार्यकारी अभियंता व संचालक, नगररचना, नाशिक महानगरपालिका या दोन वरिष्ठ पदांचा कार्यभार सोपवून स्थायी समितीच्या मान्यते शिवाय २१ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय अतिरिक्त कार्यभार आसणाऱ्या आयुक्तांनी घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतिरिक्त कार्यभार असतांना आशा प्रकारचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झालेले आहे, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१), (२) व (३) • नाशिक महानगरपालिकेच्या 'खेळाचे मैदान' या आरक्षणाकरीता दि.३०.११.२०१५ पर्यंत भूसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.०४.०३.२०१५ रोजी आदेशित केले होते.
• सदरहू भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थायी समितीने ठराव क्र.१७६, दि.१९.५.२०१६ अन्वये, रु.५६,४७,४४,२६७/- इतक्या रकमेस मान्यता दिली आहे.
• सदर भूसंपादन प्रस्तावाकरीता मागणी करण्यात आलेल्या रकमेपैकी रु.२९,६४,९०,७४०/- इतकी रक्कम महानगरपालिकेने अदा केली.
• भूसंपादन अधिकारी यांनी दि.१८/९/२०१८ रोजी उर्वरित रु.२१,४५,४८,६०३/- इतकी रक्कम अदा करण्याबाबत महानगरपालिकेस कळविले.
• महानगरपालिकेस प्रतिदिन रु.७३,६१७/- इतका व्याजाचा भुर्दंड येत असल्याने व जिल्हाधिकारी यांनी रक्कम अदा करणेबाबत आदेशित केल्याने, तत्कालिन महानगरपालिका आयुक्त यांनी दि.३१/३/२०१८ रोजीच्या आदेशान्वये देयक अदा करण्याबाबत कार्यवाही केली आहे.
• सदर रक्कम अदा करण्यात येऊ नये, याकरीता विविध पदाधिकारी यांनी हरकत घेतली आहे.

• याबाबत अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली असून, समितीचा अहवाल प्रलंबित असल्याचे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या पुनर्विकासाबाबत**

**(१५) १३५३३३ (०८-०७-२०१९). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने धारावी पुनर्विकास प्राधिकरणाने दिनांक १३ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास प्रकल्प निविदा पुर्व बैठक घेतली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत धारावी झोपडपट्टीच्या पुनर्विकासाचे काम मिळण्यासाठी मुंबईतील बड्या बांधकाम कंपन्या सहभागी झाल्या होत्या,
(३) असल्यास, प्रकल्प निविदा पूर्व बैठकीतील निर्णयात्मक कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२३-०७-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. सदर बैठकीत विकासक/बांधकाम क्षेत्रातील तज्ञ/ वास्तुशास्त्रज्ञ
व इतर अशा एकूण २० सदस्यांनी सहभाग घेतला.
(३) निविदापूर्व बैठकीत निविदा अटी व शर्तीबाबत चर्चा करण्यात आली व त्याअनुषगांने शंकांचे निरसन करण्यात आले. सदर बैठक ही निविदा प्रक्रियेतील शंकाचे निरसन करण्यासाठी असल्याने कोणताही निर्णय अपेक्षीत नव्हता. याबाबत पुढील प्रक्रिया धारावी पुनर्वसन प्रकल्प स्तरावर सुरू आहे. असा धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा अहवाल आहे.

---

**नवी मुंबई शहरात दिव्यांगांसाठी देण्यात आलेल्या पब्लिक टेलिफोन बुथचे (पीसीओ) बहु-उपयोगीता केंद्रात रूपांतर करण्याबाबत**

**(१६) १३५५६२ (११-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई शहरात दिव्यांगांसाठी देण्यात आलेल्या पब्लिक टेलिफोन बुथचे (पीसीओ) बहु-उपयोगीता केंद्रात रूपांतर करण्यास सिडकोने मान्यता दिली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बुथचे क्षेत्रफळ वाढविण्याबरोबरच आता त्यांचा ६० वर्षांचा भाडेकरार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबई सिडकोप्रमाणेच राज्यातील अन्य शहरात ही योजना राबविण्यात येणार वा येत आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१९) :** (१), (२) व (३) सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२१४४, दि.१८.०२.२०१९ अन्वये नवी मुंबई शहरातील दिव्यांगांसाठी देण्यात आलेल्या पब्लिक टेलिफोन बुथचे (पीसीओ) बहु-उपयोगीता केंद्रात रूपांतर करण्यास सिडकोने मान्यता दिली आहे. सिडको कार्यक्षेत्रातील सार्वजनिक दुरध्वनी केंद्राच्या जागेच्या क्षेत्रफळवाढीबाबत जागेची उपलब्धता तपासून कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर जागेवर नियोजनाच्या दृष्टिने इतर कोणताही प्रकल्प होणार नसल्यास अशी जागा सिडकोच्या प्रचलित नियमानुसार व दर आकारुन ६० वर्षाच्या भाडेपट्टयाने (लिजबेसीस) करण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई सिडकोप्रमाणे राज्यातील अन्य शहरात सदर योजना राबविण्याची बाब विचाराधीन नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात स्वाइन फ्ल्यूचा संसर्ग वाढत असल्याबाबत**

**(१७) १३५५६५ (११-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात स्वाइन फ्ल्यूचा संसर्ग वाढत असल्याने आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू झाल्याने महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने खाजगी वैद्यकीय रुग्णालयांना योग्य उपचाराअभावी रुग्णांचा मृत्यू झाल्यास थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे कळविल्याचे माहे मार्च, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे खाजगी रुग्णालयांनी संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१) होय.

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात मार्च २०१९ पर्यंत एकूण २१ रुग्णांचा मृत्यू झाला असून, त्यापैकी ३ मृत्यू मनपा व शासकीय रुग्णालयात व १८ मृत्यू खाजगी रुग्णालयात झालेले आहेत.

त्यामुळे खाजगी डॉक्टरांच्या हजगर्जीपणामुळे जर मृत्यू झाला तर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत महानगरपालिकेमार्फत जाहिर आवाहन करण्यात आले होते.

(२) व (३) याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत डॉक्टरांच्या विविध संघटनांसोबत चर्चा करण्यात येऊन, खालील बाबींवर संयुक्तपणे कार्यवाही करण्याचे ठरले.

१) महानगरपालिका कार्यक्षेत्रात खाजगी डॉक्टर्स यांची कार्यशाळा घेऊन त्यांना स्वाईन फ्ल्यू रुग्ण उपचाराबाबत मार्गदर्शन करावे.

२) महानगरपालिकेतर्फे स्वाईन फ्ल्यू बाबत विविध माध्यमांमार्फत जनजागृती करावी.

३) महानगरपालिकेतर्फे विलगीकरण कक्ष स्थापन करुन टॅमिफ्ल्यू औषध उपचाराबाबत कार्यवाही करावी.

४) कोणत्याही खाजगी डॉक्टरांवर कार्यवाही करण्याअगोदर सविस्तर चौकशी करुन नंतरच योग्य कार्यवाही करावी.

वरील मुद्यांच्या अनुषंगाने संयुक्तरित्या महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील भाडेपट्टयाच्या अटी शिथिल करण्याबाबत**

**(१८) १३६११८ (११-०७-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील भाडेपट्टयाच्या अटी शिथिल करण्याचा निर्णय माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान सिडकोने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१९) :** (१), (२), व (३) सिडको मालकीच्या भाडेपट्टयाच्या जमिनी लिज होल्ड ते फ्रि होल्डसम करण्याबाबत शासनाच्या दि.२०.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच सिडकोच्या नविन शहरांच्या “नवी शहरे जमीन विल्हेवाट नियमावली, १९९२” मध्ये करावयाच्या सुधारणांना दि.०७.३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.

सदर निर्णयामुळे भाडेपट्टाधारकांना लाभ होणार असून उपरोक्त दि.२०.१२.२०१८ व दि.०७.०३.२०१९ रोजीच्या पत्रानुसार सिडको महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### वडाळा (जि.नाशिक) सिध्द हनुमान मंदिरापासून गोपालवाडीमार्गे जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१९) १३६१२२ (११-०७-२०१९). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील वडाळा गावातील सिध्द हनुमान मंदिरापासून थेट श्री. श्री. रविशंकर मार्गाला गोपालवाडीमार्गे जोडणाऱ्या रस्ता महानगरपालिकेमार्फत भुमिगत गटरासाठी खोदला गेल्यानंतर मागील चार महिन्यांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असून अद्याप हा रस्ता महानगरपालिकेकडून दुरुस्त केला जात नसल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार तक्रार करुन देखील हा रस्ता महानगरपालिकेकडून दुरुस्त केला जात नसल्याने नागरीकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये वडाळा गावातील सिध्द हनुमान मंदिरापासून श्री.श्री.रविशंकर मार्गाला गोपालवाडी मार्गे जोडणारा रस्ता भुमिगत गटार पाईप लाईन टाकण्यासाठी दि.१३.०१.२०१९ ते ०५.०२.२०१९ या कालावधीत खोदण्यात आला होता.

काम पुर्ण झाल्यानंतर खड्डे बुजविण्यात येऊन रस्ता रहदारीस खुला करण्यात आला होता.

(२) यासंदर्भात महानगरपालिकेस ऑनलाईन प्रणालीव्दारे तक्रार प्राप्त झाली होती.

(३) महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, सदर रस्त्याचे खडीकरणाचे काम दि.२५.०५.२०१९ रोजी पुर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे बाधित झालेल्या सर्व शेतक-यांच्या जमिनीची नुकसान भरपाई त्वरीत देण्याबाबत

**(२०) १३६५९३ (११-०७-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे बाधित झालेल्या दहा पैकी आठ गावातील सुमारे ५० वृध्दांचा माहे डिसेंबर, २०१८ पासून तीन महिन्याच्या कालावधीत स्थलांतरामुळे मुत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने ताब्यात घेतलेल्या जमिनीची नुकसान भरपाई अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व शेतक-यांच्या जमिनीची नुकसान भरपाई त्वरीत देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) अशी बाब नाही.

ज्या भूधारकांच्या जमिनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतीने संपादित केलेल्या आहेत अशा भूधारकांना २२.५ % योजनेंतर्गत वाटप केलेल्या एकूण ११३० भूखंडांपैकी ३१७ भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा करण्यात आला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे स्थलांतरीत होणाऱ्या गावामधील एकूण २७८६ बांधकामांपैकी २४४७ बांधकामाचे करारनामे करण्यात आले असून २१६४ भूखंडाचे ताबे देण्यात आले आहेत. २७८६ बांधकामांपैकी २३८३ बांधकामे निष्कासित करण्यात आली असून धोरणानुसार त्यांना बांधकाम अनुदान, उदरनिर्वाह भत्ता, वाहतूक भत्ता रु.५०० प्रमाणे प्रोत्साहन भत्ता व १८ महिन्याचे घरभाडे इत्यादी देण्यात आले आहे. उर्वरित बांधकाम धारकांना वेळोवेळी अवाहन करुन बांधकामे निष्काषित करुन या योजनेचा लाभ घेणेबाबत कळविण्यात येत आहे.

(३) दि.०१.०३.२०१४ व दि.२८.०५.२०१४ च्या शासन निर्णयानुसार संपादित जमिनीबद्दल २२.५% योजनेनुसार विकसित भूखंड तथा स्थलांतरीत होणाऱ्या बांधकामाबद्दल पुनर्वसन व पुन:स्थापना योजनेनुसार भूखंड व आर्थिक लाभ देण्यात येत आहेत. त्यानुसार वाटपीत भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नाशिक शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहांची भाडेवाढ रद्द करून मोफत किंवा नाममात्र दर आकारण्याबाबत

**(२१) १३६६०७ (११-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहांची रेडीरेकनरच्या २.५% दराने करण्यात आलेली अवाजवी भाडेवाढ रद्द करून मोफत किंवा नाममात्र दर आकारण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक २० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहांना सील लावल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना कार्यक्रमांसाठी जागा नाही त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. नाशिक शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहांना लावण्यात आलेले सिल

काढण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मार्च २०१९ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) होय.
मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.२० मार्च, २०१९ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) होय.
(३) • नाशिक महानगरपालिकेच्या मिळकतींबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.११८/२०१८ दाखल झालेली आहे.
• याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार मिळकतींचे विभागनिहाय सर्वेक्षण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत समिती गठीत करण्यात आली आहे.
• त्याअनुषंगाने नियमबाह्य वापर असलेल्या एकूण ३८२ मिळकतींना तूर्तास सिल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.
• मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून, सिल करण्यात आलेल्या ३८२ मिळकतींपैकी यापुर्वी करारनाम्याने दिलेल्या ११७ मिळकती नियमानुसार भाडेशुल्क भरण्यास तयार असलेल्या व्यक्ती/संस्था यांचे हमीपत्र घेऊन, महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात खुल्या करुन देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील गोदावरी नदीपात्र व परिसरात प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२२) १३६७४६ (१३-०७-२०१९). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील गोदावरी नदीत प्रदुषण करणा-यांवर महानगरपालिका प्रशासनाने दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून दंडात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया थांबवली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी नदीतील प्रदुषण थांबविण्यकरिता एका त्रयस्त मक्तेदारास महानगरपालिका प्रशासनाकडून नदीतील पानवेली व प्लॅस्टीक कचरा काढण्याचा ठेका दिला होता पंरतु सदर ठेकेदाराचे कर्मचारीच गायब असल्याने नदी प्रदुषणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे नदीपात्र व परिसरात अस्वच्छता निर्माण करणा-यावंर प्रशासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत गोदावरी नदीपात्रात प्रदुषण करणाऱ्या नागरीकांवर रु.१०००/- याप्रमाणे दंड आकारणी केली जाते. तद्नंतर पुन:श्च त्या नागरीकाने असे कृत्य केल्यास त्यास रु.५०००/- दंड आकारला जातो.

सदर दंडात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत थांबविण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

गोदावरी नदीपात्र स्वच्छता करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत ई-निविदा प्रक्रियेंतर्गत मक्तेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

निविदेतील अटी-शर्तीमध्ये नमूद असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येप्रमाणे गोदावरी नदी पात्र स्वच्छतेचे काम मक्तेदारामार्फत सुरु आहे.

(३) नदीपात्र व परिसरात अस्वच्छता निर्माण करणाऱ्यांवर महानगरपालिका प्रशासनाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेशासाठी सन २०३१ पर्यंत परिवहन धोरण ठरविण्यासाठी 'परिवहन अभ्यास' तयार करण्याबाबत

**(२३) १३७८६४ (११-०७-२०१९). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने एमएमआरडीएमार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर प्रदेशासाठी सन २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मुंबई महानगर प्रदेशातील लोकांच्या प्रवासाची पध्दत व प्रकार जाणून घेणे आणि या प्रदेशासाठी सन २०३१ पर्यंत परिवहन धोरण ठरविण्यासाठी "परिवहन अभ्यास" तयार करुन अंतिम अहवाल माहे जुलै, २००८ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्याचे फायदे काय आहेत,

(३) असल्यास, या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत काय, त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) मुंबईतील वाहतूक व परिवहन व्यवस्था सक्षम, कार्यक्षम आणि सुधारणा करण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) अंतर्गत, जागतिक बँकेच्या तांत्रिक सहाय्याने वर्ष २००५- २००८ मध्ये सल्लागारामार्फत सर्वंकष परिवहन अभ्यास (Comprehensive Transportation Study) आणि व्यवसाय आराखडा (Business Plan) प्राधिकरणास वर्ष २००८ मध्ये सादर केला.

सदर सर्वंकष परिवहन अभ्यास अहवालास दिनांक १५ मार्च, २००८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२१ व्या बैठकीत मान्यता मिळाली आहे.

(२) सर्वंकष परिवहन अभ्यास २००८ च्या अहवालानुसार मुंबई महानगर प्रदेशासाठी क्षितीज वर्ष २०३१ पर्यंत ४५० कि.मी. चे मेट्रो मार्गाचे, २४८ कि.मी. उपनगरीय रेल्वे मार्गाचे आणि १७४० कि.मी. चे रस्त्यांचे जाळे प्रस्तावित/शिफारस केलेले आहे. प्रस्तावित मार्गाची (मेट्रो, उपनगरीय रेल्वे आणि महामार्ग) प्रस्तावित कालावधीत अंमलबजावणी झाल्यास वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि प्रवाशी वेळेत परिणामकारक बचत होईल. तसेच वाहतूक परिवहन व्यवस्थेच्या टक्क्यामध्ये सुधारणा होईल.

(३) अभ्यासात नमूद केलेल्या विविध परिवहन योजना व प्रकल्पांच्या शिफारशींचा प्रामुख्याने विचार करुन त्यांचे नियोजनबद्ध व निधी उपलब्धतेनुसार संबंधित संस्थांमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सर्वंकष परिवहन अभ्यास व व्यवसाय आराखडा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर गेल्या दशकात, महानगर प्रदेशात मोठया प्रमाणात परिवहन आणि जमीन वापर (Land use) यात सुधारणा/बदल झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने वडाळा येथील नवीन (रहिवासी आणि व्यवसायिक) जमीन वापर, मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाच्या संचलनातील सुधारणा, नवीन मेट्रो आणि मोनो रेल, प्रस्तावित नवी मुंबई विमानतळ (NMIA), नवी मुंबई विमानतळ प्रभावित क्षेत्र (NAINA), जेएनपीटी येथे प्रस्तावित विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ), कल्याण आणि भिवंडी परिसरात २७ आणि ५१ गावांचा विकास आराखडा, प्रस्तावित जलवाहतूक प्रकल्प इत्यादींचा समावेश आहे.

वर उल्लेखीत प्रस्तावित पायाभूत सुविधांमूळे बदल आणि यांचा परिणाम लक्षात घेऊन सर्वंकष परिवहन अभ्यासाचे अद्यावतीकरणाचे काम सल्लागारामार्फत प्रगतीपथावर आहे. सदर अभ्यासामध्ये मुंबई महानगर प्रदेशासाठी क्षितीज वर्ष २०२१,२०२६,२०३१ आणि २०४१ साठी अनुक्रमे तत्काळ, लघु, मध्यम आणि दीर्घ मुदतीसाठीचा परिवहन आराखडा तयार करण्यात आला आहे. सल्लागारामार्फत सदर अभ्यासाचा अंतिम मसुदा अहवाल लवकरच प्राधिकरणास सादर होणे अपेक्षित आहे.

---

## मुंबई शहरातील सायन बांद्रा लिंक रोडवरील मिठी नदी पात्रालगत उभारण्यात आलेली शेकडो मीटर लांबीची संरक्षक भिंत खचल्याबाबत

**(२४) १३७८७२ (११-०७-२०१९). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सायन बांद्रा लिंक रोडवरील मिठी नदी पात्रालगत उभारण्यात आलेली शेकडो मीटर लांबीची संरक्षक भिंत खचली असून ठिकठीकाणी कोसळली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनूसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
सदरची भिंत खचली नसून अनधिकृतपणे कचरा टाकण्यासाठी समाज कंटकांमार्फत काही ठिकाणी तोडण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंभारमाठ मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे असलेल्या म्हाडा वसाहतीत पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याबाबत

**(२५) १३७८९३ (११-०७-२०१९). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंभारमाठ मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे म्हाडा वसाहतीत पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने २६० कुटुंब गत १० वर्षापासून कोकण म्हाडा व शासनाकडे सातत्याने पाणीपुरवठयाची मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालवण नगरपरिषद, मालवण यांनी दिनांक १२ जुलै, २०११ रोजीच्या पत्रान्वये मालवण शहर पाणीपूरवठा योजना टप्पा-२ या योजनेव्दारे पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मालवण शहर पाणीपूरवठा योजना टप्पा-२ या योजनेत सदर म्हाडा वसाहतीस सामावून घेऊन पाणीपूरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१९) :** (१) कुंभारमाठ येथील म्हाडा वसाहत मालवण नगरपरिषद क्षेत्रात समाविष्ट नसून, सदर वसाहत नगरपरिषद हद्दीबाहेर सुमारे ३ कि.मी. अंतरावर आहे. म्हाडा कार्यालयाकडून सदर वसाहतीला पाणीपुरवठा करण्याबाबतची मागणी मे, २०११ च्या दरम्यान मालवण नगरपरिषदेकडे करण्यात आली होती.
(२), (३) व (४) • मालवण शहर पाणीपुरवठा योजना टप्पा-२ प्रकल्पामध्ये कुंभारमाठ म्हाडा वसाहतीला पाणी पुरवठा करणे ही बाब समाविष्ट आहे.
• मालवण शहर पाणीपुरवठा योजना टप्पा-२ योजनेला महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) योजनेतून दि.१७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

• महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून, सदर प्रकल्प सध्या निविदाधीन आहे.

---

**दुर्गाडी चौकात (ता.कल्याण, जि.ठाणे) शिवाजी महाराजांच्या पुतळयाजवळील कोनशिलेची डागडुजी करणेबाबत**

**(२६) १३७९९० (११-०७-२०१९). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिमेकडील दुर्गाडी चौकात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून या पुतळयाची कोनशिला कोसळल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे पुतळा परिसरातील देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवाजी महाराजांच्या पुतळयाची तातडीने डागडुजी व परिसरातील देखभाल दुरुस्तीकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधील दुर्गाडी चौकातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची कोनशिला दि.२९.०४.२०१९ रोजी पडल्याचे निदर्शनास आल्यावर, महापालिका स्तरावर तातडीने डागडुजी करून सदर कोनशिला पूर्ववत बसविण्यात आलेली आहे.

• दुर्गामाता चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची व चौकाची देखभाल दुरूस्ती व स्वच्छता महानगरपालिकेमार्फत नियमित करण्यात येते.

• महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये "पुतळ्याची दुरूस्ती, देखभाल व सुशोभिकरण करणे" या लेखाशिर्षका अंतर्गत दरवर्षी तरतूद केली जात असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २७ गावांतील नागरी समस्यांबाबत**

**(२७) १३८३२९ (११-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २७ गावांत विविध नागरी समस्या असून स्वतंत्र नगरपालिकेच्या मागणीकडेही दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांची जमीन संपादित केली जाणार आहे, परंतु जागेच्या मोबदल्याबाबत स्पष्टता दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २७ गावांतील पाच गावांच्या जमिनीवर टाऊन प्लॅनिंग स्कीम अंतर्गत आरक्षण टाकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन उक्त प्रकरणी कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) • दि. ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी उक्त २७ गावांसाठी नगरपरिषद गठित करण्यासाठी प्राप्त अधिसूचनेचा मसूदा प्रसिध्द केला आहे.
• सदर २७ गावांची नगरपरिषद स्थापन करण्यासाठी प्राप्त हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(२), (३) व (४) • २७ गावांसाठीच्या विकास योजनेत दि. ११.०३.२०१५ अन्वये सारभूत स्वरूपाचे फेरबद्दल (E.P) वगळून मंजूर केलेली आहेत.
• सदरचे सारभूत स्वरूपाचे फेरबद्दल (E.P) करीता शासन अधिसूचना दि. ०९.०५.२०१७ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.
• सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने संबंधित क्षेत्रातील जमिनमालक यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मंजूर विकास योजनेमधील आरक्षणे व रस्त्यांचे क्षेत्र संपादीत करण्याबाबत कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली असून, विकास योजनेतील रस्ते व आरक्षणे यांचे क्षेत्र संपादीत करण्याबाबतचे धोरण स्पष्ट आहे.
• २७ गावांमध्ये नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्रामध्ये नगररचना परियोजना राबविणेबाबतचा इरादा जाहीर केला नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत भूमाफिया आणि रहिवाशांनी मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे केली असल्याबाबत

**(२८) १३८३३४ (१२-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत भूमाफिया आणि रहिवाश्यांनी मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे सुरु केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमण नियंत्रण विभाग व प्रभाग अधिकारी बांधकामाकडे दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१९) :** (१) सन २०१० ते २०१८ अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घोषित केलेली ३५५६ तर एमएमआरडीएने घोषित केलेल्या २२९ अशा एकूण ३७८५ अनधिकृत बांधकामाची यादी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केली आहे.

(२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात “प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी” अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०६ व २६७(१) अन्वये नोटीस काढून बांधकाम धारकास “अधिकृतता” दर्शविणारे कागदपत्र सादर करणेबाबत सुनावणी आयोजित करतात.

• सदरचे बाधंकाम अनधिकृत असल्यास बांधकाम धारकास स्वखर्चाने सदर बांधकाम काढून टाकण्याची सूचना दिल्या जातात.

• सदरचे बांधकाम बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते.

• सन २०१५ ते २०१८ अखेरपर्यंत महापालिकेच्या एकुण १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत एकुण ७६४५ इतकी अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. तसेच निष्कासन कारवाईच्या वेळी निष्कासन खर्चापोटी रक्कम रू.१,९६,५५०/- इतकी संबंधित बांधकाम धारकांकडून वसुल करण्यात आलेली आहे.

• प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी संबंधित बांधकाम धारकांविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३(२) आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३९७ अन्वये अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर आजपर्यंत ३६९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द निरंतर कार्यवाही करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापूर्वी खड्डे व चर भरण्याची कामे आचारसंहितेमुळे रखडल्याबाबत

**(२९) १३८३४० (१२-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील पावसाळयापूर्वी खड्डे व चर भरण्याची कामे आचारसंहितेच्या कचाट्यात सापडली असून खड्डे भरण्यासाठी २० कोटी व इतर विकास कामांचे १५ कोटी रुपयांचे प्रस्ताव आचार संहितेपूर्वी तयार करण्यात आले होते असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्तांनी हे प्रस्ताव तत्परतेने स्थायी समिती समोर पाठविले असते तर ते अन्य कामाप्रमाणे मंजूर करण्याची प्रक्रिया तत्काळ पार पडली असती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांची निविदा प्रक्रिया २५ फेब्रुवारी पूर्ण होऊन त्याच दिवशी ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया प्रशासनाने पार पाडणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनामार्फत सदर कामात विलंब झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१९) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील खड्डे दुरूस्तीसाठी एकूण रू. १५.२९ कोटी व सेवावाहिन्यांच्या खोदलेल्या चरी भरणेकरीता रू.२१.०० कोटी रक्कमेच्या १ वर्ष कालावधीच्या जाहीर निविदा लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांची आचारसंहिता लागू होण्यापुर्वी मागविण्यात आल्या होत्या, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) • सदर कामाच्या निविदा मंजूरीबाबत कार्यवाही सुरू असताना दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांची आचारसंहिता लागू झाली.

• याअनुषंगाने कामांची तातडी विचारात घेऊन सदर कामांच्या निविदा स्विकृत करणे व कार्यादेश देण्याच्या मान्यतेसाठी दि. २०.०३.२०१९ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला असता, निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन पुढील प्रक्रिया करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला कळविण्यात आले.

• तद्नंतर दि. ०६.०५.२०१९ रोजी स्थायी समितीने सदर प्रस्तावास मंजूरी दिली.

• सदर मान्यतेस अनुसरून दि.११.०५.२०१९ पासून खड्डे दुरूस्तीच्या कामांना सुरूवात करण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शास्त्रोक्त भरावभूमी प्रकल्पाबाबत**

**(३०) १३८३६४ (१२-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेने लादलेल्या शास्त्रोक्त भरावभूमी प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध असताना देखील जमीन बळकावून ह्या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या सन २०१६ च्या राजपत्रात केलेल्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१९) :** (१) • स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचऱ्याच्या शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी शहर विकास योजनेंतर्गत आरक्षित असलेल्या मौजे उंबर्डे व बारावे येथे एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व शास्त्रोक्त भरावभूमी उभारण्यासाठी येथील प्रकल्पांना पर्यावरण विभागाकडून ना-हरकत दाखला दि. ०८.०६.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. मौजे मांडा-टिटवाळा येथील प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाचा "ना-हरकत दाखला" प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.
• त्यानुसार मौजे उंबर्डे व बारावे येथील प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून दोन्ही प्रकल्पास स्थानिक जनतेचा विरोध आहे. सद्यस्थितीत मौजे उंबर्डे येथील प्रकल्पाचे काम सुरू असून मौजे बारावे येथील प्रकल्पाच्या विरोधात श्री. राजेश लुल्ला व इतर यांनी राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडे दावा दाखल केला. याबाबत पुढील सुनावणी राज्यस्तरीय घनकचरा व्यवस्थापन समितीकडे सुरू आहे.
• शहर विकास योजनेअंतर्गत घनकचरा प्रकल्पासाठी बाधित होत असलेली जागा महापालिकेच्या नगररचना विभागामार्फत जागा मालकांना टिडीआर देऊन संपादीत केलेली आहे. त्यामुळे जमिन बळकावून काम सुरू केले, हे वस्तुस्थितीस धरून नाही.
(२) घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ व EIA Notification २००६ नुसार पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासनाने मौजे उंबर्डे व बारावे येथील प्रकल्पास "ना-हरकत दाखला" दिलेला असून, नियमांचे उल्लंघन झाले हे वस्तुस्थितीस धरून नाही.
(३) व (४) • दि. ८.०७.२०१९ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली या विषयाबाबत झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.
१) मौजे उंबर्डे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम दि.१५.०९.२०१९ पर्यंत पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करावा.
२) कल्याण-डोंबिवली शहरातील निर्मितीच्या जागी कचऱ्याचे विलगीकरण करून विलगीकृत ओला व सुका कचरा मौजे बारावे येथील प्रकल्पात जाईल, याची दक्षता घ्यावी. सदर प्रकल्पाचे काम दि.१५.०१.२०२० पर्यंत पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करावा.
३) मौजे उंबर्डे व मौजे बारावे येथील घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करून आधारवाडी येथील डम्पिंग ग्राऊंड शास्त्रोक्तरीत्या जैव प्रक्रिया (Bio-mining) करून २ वर्षात पूर्णपणे बंद करणे.

---

## अकोला जिल्हयातील नागरिकांच्या रखडलेल्या घरांच्या बांधकामाचे नकाशे त्वरीत मार्गी लावण्याबाबत

**(३१) १३८३६७ (१३-०७-२०१९). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील नागरिकांच्या रखडलेल्या घरांच्या बांधकामाच्या नकाशाबाबत त्वरीत निर्णय घेण्यासाठी माहे फेब्रुवारी महिन्यात प्रशासनाने कार्यशाळा घेवून नागरिकांना आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिका-यांच्या वर्चस्वाच्या लढाईत १०० बांधकाम मंजुरीचे नकाशे रखडल्यामुळे नागरिकांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) अकोला महानगरपालिकेमध्ये बांधकाम नकाशा मंजुरीकरीता दि.२४/०९/२०१८ पासून Building Plan Management System लागू करण्यात आलेली आहे.

तत्पूर्वी, Auto-DCR प्रणालीमार्फत बांधकाम नकाशे दाखल करण्यात येत होते. या दोन्ही प्रणालीच्या संक्रमण कालावधीमध्ये खाजगी अभियंता/वास्तूविशारद यांना येणा-या तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्याकरीता तसेच अपु-या तांत्रिक कर्मचारी वर्गामुळे रखडलेल्या बांधकाम परवानगी प्रकरणाचा त्वरीत निपटारा करण्याच्या उद्देशाने फेब्रुवारी महिन्यात कार्यशाळा घेण्यात आलेली होती.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र नगरोत्थान योजनेतून देगलूर (जि.नांदेड) येथे बांधण्यात आलेल्या शादीखान्याबाबत**

**(३२) १३८५६३ (१२-०७-२०१९). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील देगलूर नगरपरिषदेच्या नंरगल रस्त्यावर मुस्लीम बाहूल वस्तीमध्ये नगरोत्थान योजनेअंतर्गत ५९ लाख रुपये खर्चून इमारत बांधकाम मागील ३ वर्षापुर्वी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीचा लोकार्पण सोहळा न झाल्यामुळे या इमारतीची नासधूस तोडफोड होऊन समाजकंटकांकडून गैरवापर करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचे लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या शादीखान्यापासून मुस्लीम बहुल वस्तीतील समाजबांधवाना सदर सुविधांना लाभ देण्यापासून वंचित ठेवण्यात आले याबाबत चौकशी करुन संबंधीतांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली तसेच शादीखाना लवकरात लवकर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर शादीखान्याची कुठल्याही प्रकारची तोडफोड अथवा गैरवापर करण्यात आलेला नाही. सदर इमारत ही नगरपरिषदेच्या ताब्यात असून सुस्थितीत आहे.

(३) व (४) सदर इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मुल्यांकन करुन घेतल्यानंतर, लिलाव पद्धतीने पात्र संस्थेस वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्यासह चालविण्याकरीता ठेका देण्याचे प्रस्तावित आहे.

• सदर इमारत मुस्लिम बहुल वस्तीतील समाजबांधवांसाठी खुली करुन, त्याचा लाभ सर्व नागरिकांना होणार असल्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने अहवाल सादर केला आहे.

---

**नाशिक शहरातील डॉ.झाकिर हुसेन रुग्णालयातील मुख्य स्वाईन फ्ल्यू कक्ष बंद करण्यात आल्याबाबत**

**(३३) १३८९०१ (१२-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील डॉ.झाकिर हुसेन रुग्णालयातील मुख्य स्वाईन फ्ल्यू कक्ष बंद करुन त्यास कुलूप लावल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपये खर्च करुन सुरु केलेल्या या स्वाईन फ्ल्यू कक्षातील एकाही यंत्रणेचा वापर मागील काही वर्षापासून केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कक्ष बंद करण्याची व कक्षातील यंत्रणेचा वापर न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, हा कक्ष तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

• नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकिर हुसेन रुग्णालयात जानेवारी २०१९ पासून स्वाईन फ्ल्यू कक्ष सुरु करण्यात आला आहे.

• सदर कक्षात मे २०१९ पर्यंत एकूण ३२ संशयित स्वाईन फ्ल्यू रुग्णांवर उपचार करण्यात आला आहे.

• सदर स्वाईन फ्ल्यू कक्षातील उपलब्ध सर्व यंत्रांचा नियमितपणे वापर करण्यात येत असून, सदर कक्ष नियमितपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातपूर विभागातील (जि.नाशिक) पिंपळगाव बहुळा शिवारातील वस्त्यांसाठी पाण्याचे योग्य नियोजन करण्याबाबत**

**(३४) १३८९०३ (१३-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर विभागातील (जि.नाशिक) पिंपळगाव बहुळा शिवारातील वस्त्यांसाठी जलकुंभ उभारले असून पाणी वितरणाचे योग्य नियोजन न केल्याने येथील रहिवाश्यांना जल संकटाचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागाचा पाणी प्रश्न सुटण्यासाठी अंतर्गत जलवाहिन्यांची कामे हाती घेण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) नाही.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील पिंपळगाव बहुला शिवारातील वस्त्यांसाठी श्रमिक नगर जलकुंभ (२० ल.लि. क्षमता) व राधाकृष्ण जलकुंभ (२० ल.लि. क्षमता) या जलकुंभावरुन १२०० मी.मी. व्यासाच्या थेट पाईपलाईनवरुन महानगरपालिकेमार्फत सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) पिंपळगाव बहुला शिवारातील वस्त्यांना भविष्यात पाणी प्रश्न उद्भवु नये याकरिता राधाकृष्ण नगर या नविन जलकुंभावरुन मुख्य व उपजलवाहिन्या टाकण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत**

**(३५) १३९२४६ (१३-०७-२०१९). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरामध्ये ब्रिटीशांनी बांधलेल्या अहिल्यादेवी होळकर (व्हीक्टोरीया) पुल तसेच मुंबई-आग्रा महामार्गावर आडगाव जवळील पुल व वालदेवी नदिवरील पुल या तीनही पुलांना १०० वर्षापेक्षा जास्त वर्षे पुर्ण झालेली असून ब्रिटीश कंपनीने या पुलांचे आयुर्मान संपल्याचे नाशिक महानगरपालिकेस कळविलेले असून देखील या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले नसल्याची धक्कादायक बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका कंपनीस या तीनही पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी कार्यारंभ आदेश देऊनसुध्दा काम पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व या तीन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यास तसेच नविन बांधकामासाठी शासनस्तरावरुन निधीसह मंजुरी देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१९) :** (१) व (२) • नाशिक शहरात ब्रिटीश काळात बांधण्यात आलेले अहिल्याबाई होळकर पुल (व्हिक्टोरीया), वालदेवी पुल व नेत्रावती नदीवरील पुल हे तीन पुल आहेत.
• या पुलांची सद्यस्थिती व करावयाच्या डागडुजीबाबत प्राथमिक अहवाल तयार करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत दि.१९/१२/२०१८ रोजी मे.लाडगे प्रोजेक्ट्स ॲण्ड टेक्नॉलॉजीस प्रा.लि. या खाजगी संस्थेस कार्यादेश देण्यात आला होता.
• सदर संस्थेने तीनही पुलांचा प्राथमिक पाहणी अहवाल महानगरपालिकेस सादर केला आहे.
(३) • सदर प्राथमिक पाहणी अहवालात होळकर पुल व वालदेवी पुलाची किरकोळ डागडुजी करणेबाबत नमूद आहे.
• त्याअनुषंगाने, सदर दोन्ही पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन मिळण्याबाबत अधिक्षक अभियंता, ब्रिज डिझाईन सर्कल, नवी मुंबई यांचेकडे महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
• तसेच, प्राथमिक पाहणी अहवालात नेत्रावती नदीवरील पुलाची मोठ्या प्रमाणावर क्षती झाल्याने पुलाचे मजबुतीकरण त्वरीत हाती घेणेबाबत नमुद असल्याने, यासाठी महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात रु.६५ लक्ष इतकी तरतूद केलेली असून, सदर पुलाचे जागी नविन पुल बांधण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चुंचाळे शिवार (नाशिक) येथे महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या सदनिकांमध्ये भाडेकरु राहत असल्याबाबत

**(३६) १३९२५१ (१३-०७-२०१९). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान योजनेअंतर्गत चुंचाळे शिवार (नाशिक) येथे महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या सदनिकांमध्ये भाडेकरु राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने बांधलेल्या चुंचाळे शिवार येथील घरकुल योजनेचा ज्या लाभार्थ्यांनी लाभ घेतला त्या सदनिका भाडेतत्वावर देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक महानगरपालिका प्रशासनाने या संपुर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानूसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील चुंचाळे शिवार येथे एकूण ३७६० घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून, त्यापैकी ३५९१ घरकुलांचे वाटप पात्र झोपडीधारकांना करण्यात आले आहे.

यापैकी काही घरकुलधारकांनी त्यांचे घरकुल भाडेतत्वावर दिल्याची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली होती.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत घरकुलांची तपासणी केली असता दोन घरकुले भाड्याने दिलेले असल्याचे निदर्शनास आले.

(३) महानगरपालिकेच्या तपासणीत भाड्याने देण्यात आल्याचे आढळून आलेली दोन घरकुले सील करुन महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक येथील स्मार्ट सिटी योजनेतील कामे दर्जेदार व्हावीत याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पहाणी करण्याबाबत

**(३७) १३९३४३ (१३-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून सुरू असलेल्या स्मार्ट सिटी योजनेतील कामे दर्जेदार व्हावीत याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून पहाणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी योजना, नाशिक यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) • मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी यांना दिनांक २५/१०/२०१९ रोजी मा. लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

• सदर निवेदनात मा. लोकप्रतिनिधींकडून स्मार्ट सिटी योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची देयके अदा करण्यापूर्वी त्रयस्थ यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाहणी करूनच देयके अदा करणेबाबत विनंती करण्यात आली होती.

(२) व (३) • मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार डिसेंबर, २०१८ च्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव पारीत करण्यात आला.

• त्याअनुषंगाने, स्मार्ट सिटी योजनेंतर्गत प्रकल्पांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करण्यात आली आहे.

• प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या कामाची पहाणी महानगरपालिकेच्या गुणवत्ता विभागाकडून नमुना तपासणी केली जाते.

• त्याचप्रमाणे, कामांबाबत काही विशिष्ट तक्रारी असल्यास, शासकिय तंत्रनिकेतन, नाशिक रोड या त्रयस्त यंत्रणेमार्फत तपासणी करून घेत असलेबाबत व कामे दर्जेदार होण्याबाबत सर्व स्तरावर लक्ष पुरविले जात असलेबाबत अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी नाशिक स्मार्ट सिटी यांनी शासनास सादर केला आहे.

---

**लोकप्रतिनिधींना मागितलेली माहीती उपलब्ध करुन न दिल्याबाबत**

**(३८) १३९३४५ (१३-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहर अभियंता व आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्याकडे विधानसभा अधिवेशनासाठी आवश्यक माहीतीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने माहीती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विधानसभा अधिवेशनासाठी आवश्यक माहीती न देण्याची कारणे कोणती आहेत,

(४) असल्यास, विधानसभा अधिवेशनासाठी आवश्यक माहीती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) मा.लोकप्रतिनिधी यांनी खालील माहिती मिळणेबाबत नाशिक महानगरपालिकेकडे मागणी केली होती.

• महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत मार्च २०१८ ते जानेवारी २०१९ पर्यंत कोणकोणत्या कामांची टेंडर प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

• सदर टेंडरमध्ये किती व कोणत्या ठेकेदारांनी सहभाग घेतला याची काम निहाय माहिती.

• टेंडर प्रक्रियेतील अपात्र ठरविण्यात आलेल्या ठेकेदारांचे काम निहाय नाव व अपात्र ठरविण्यात आल्याचे कारण.

• टेंडर प्रक्रियेतून काही ठेकेदारांनी माघार घेतली असल्यास त्यांची नावे व कारण.

(२) नाही.

• मा.लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी भागश: माहिती दि.१४/०२/२०१९ रोजी महानगरपालिकेमार्फत देण्यात आली.

• काही माहिती महानगरपालिकेच्या विविध विभागातील कार्यालयातून संकलित करावयाची असल्याने, महानगरपालिकेमार्फत सदर माहिती संकलित करुन दि.१५/०६/२०१९ रोजी देण्यात आली आहे.

• सदर माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने, भागश: माहिती देऊन, उर्वरित माहितीचे संकलन करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आकाशवाणी टॉवर, गांगपूर रोड येथील जलतरण तलावाच्या प्लानबाबत**

**(३९) १३९३४९ (१३-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकाशवाणी टॉवर, गंगापूर रोड येथील जलतरण तलावाचा प्लान दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास ऑनलाइन पद्धतीने नगरविकास विभाग, नाशिक महानगरपालिका यांना सादर करण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५ दिवसात सादर करण्यात आलेले मान्य किंवा अमान्य करण्यात येणे याबाबत आदेश असतांना ६ महिन्याचा कालावधी होऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक हिताचा प्लान वेळेत मान्य न करण्याची कोणती कारणे आहेत तसेच वेळेत कार्यवाही न कारणाऱ्या आधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) आकाशवाणी टॉवर, गंगापुर रोड येथील जलतरण तलावाचा प्रस्ताव दिनांक १४/०१/२०१९ रोजी Auto DCR कार्यप्रणाली अंतर्गत दाखल झालेला आहे. तत्पूर्वी सुमारे ७४ दिवस सदरचा प्रस्ताव जलतरण तलावाचे वास्तुविशारद यांचेकडे प्रलंबित होता.

(२) व (३) जलतरण तलावाचे वास्तुविशारद यांनी निर्धारीत स्वरुपात (Prescribed form) प्रस्ताव दाखल न केल्यामुळे त्रुटी दुरुस्तीसाठी सदरचा प्रस्ताव सुमारे १०० दिवस प्रलंबित होता. त्यामुळे विहित मुदतीत प्रस्ताव मान्य किंवा अमान्य करणे शक्य झाले नाही

सदर जलतरण तलावाचा प्रस्ताव खालील कारणास्तव मंजुर करण्यात आलेला नाही.

• जमीनीचा ७/१२ उतारा प्रस्तावासोबत जोडलेला नाही.

• जमीन मालकाच्या कोठेही स्वाक्षऱ्या नाहीत.

• जमीनीचा सरकारी मोजणी नकाशा सादर केलेला नाही.

• जमीनीच्या मोजणी नकाशावर अधिकृत व्यक्ती/ अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

• प्रस्तावातील नकाशावर अस्तित्वातील मा.आमदार यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधलेले शेड दर्शविण्यात आलेले नाहीत.

उपरोक्तनुसार आवश्यक कागदपत्रांची व त्रुटींची पुर्तता करुन परिपुर्ण प्रस्ताव दाखल न झाल्यामुळे प्रस्तावास मंजुरी देणे शक्य झाले नाही, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बिटको रुग्णालय आणि जुन्या नाशिक शहरात व वडाळा (जि.नाशिक) गावात बांधलेल्या नविन रुग्णालयाच्या इमारती वापराविना पडून असल्याबाबत**

**(४०) १३९३६१ (१३-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात बिटको रुग्णालय आणि जुन्या नाशिक शहरात व वडाळा गावात बांधलेल्या नविन रुग्णालयाच्या इमारती वापराविना पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालये सुरु करुन वापरात आणण्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१९) :** (१) व (२) नाशिक महानगरपालिका हद्दीतील वडाळा गावात बांधण्यात आलेली रुग्णालय इमारत कार्यरत असून वापरात आहे.
तसेच, नविन बिटको रुग्णालय इमारतीचे बांधकाम सुरु असून, बांधकाम पुर्ण होताच सदर इमारतीचा वापर सुरु करण्यात येणार आहे, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईस्थित एम-पूर्व विभागातील शिवाजीनगरमधील एमएमआरडीएच्या इमारतींमध्ये अवैधरित्या नागरिक राहत असल्याबाबत**

**(४१) १३९५७३ (१३-०७-२०१९). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईस्थित एम-पूर्व विभागातील शिवाजीनगरमधील एमएमआरडीएच्या इमारतींमधील घरांवर दलालांनी अतिक्रमण केले असून तेथे अनधिकृतरित्या नागरिक राहत असल्याचे दिनांक १३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीमधील बंद घरांचे कुलूप तोडुन दलालांनी सदनिका परस्पर लोकांना विकल्या असून याद्वारे सामान्य नागरिकांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवाजीनगर येथे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेल्या एमएमआरडीएच्या ६७ इमारती असून यात एकूण २५ हजारांपेक्षा अधिक नागरिक राहत असून महानगरपालिका, एमएमआरडीए यांच्या अखत्यारीत सदर इमारती येत असून दोन्ही प्रशासन स्थानिकांच्या समस्या सोडविण्यास टाळटाळ करित असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) प्राधिकरणाच्या नटवर पोरख इंडियन ऑईल कंपाऊड, गोवंडी येथील पुनर्वसन वसाहतीमध्ये एकूण ३५ इमारती असून त्यामध्ये ६१ विंग आहेत. त्यापैकी २७ इमारती बृहन्मुंबई महानगरपालिकेस तर ३ इमारती टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरीत केल्या आहेत.

मुंबईस्थित एम पूर्व विभागातील शिवाजी नगरमधील एमएमआरडीएच्या ताब्यातील इमारतीमधील रिक्त सदनिकांची पाहणी प्राधिकरणाचे अधिकारी / कर्मचारी यांनी दिनांक १६/०५/२०१९ रोजी केली. इमारत क्र. ३२/ए मधील सदनिका क्र. १०५ मध्ये सदर पुनर्वसन वसाहतीच्या परिरक्षणार्थ प्राधिकरणामार्फत नेमणूक केलेल्या मे. जी.के. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांचे साईट सुपरवायझर आपल्या परिवारासमवेत वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास आले. सदर अनधिकृत वापर करीत असलेली सदनिका रिक्त करुन सिलबंद करण्याबाबत मे. जी.के. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांना कळविण्यात आले.

प्राधिकरणाचे अधिकारी / कर्मचाऱ्यांनी दिनांक २५/०५/२०१९ रोजी सदर साईटची पाहणी केली असता, मे. जी.के. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांचे मार्फत सदनिका क्र. १०५ सिलबंद केल्याचे निदर्शनास आले. सदरच्या अनधिकृत वापराबाबत माहे जानेवारी, २०१९ ते माहे मे, २०१९ या कालावधीत सदनिकांमधील वास्तव्याबाबत प्राधिकरणाने दिनांक ०७/०६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये मे.जी.के. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांना रु.७५,०००/- इतका दंड आकारला आहे.

(२) हे खरे नाही. मुंबईस्थित एम पूर्व विभागातील शिवाजी नगर येथील एमएमआरडीएच्या ताब्यातील इमारतीमधील रिक्त सदनिका सिलबंद असून प्राधिकरणाच्या ताब्यात आहेत व त्या प्राधिकरणामार्फत नेमणूक कलेल्या मे.जी के सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. या संस्थेकडे परिरक्षणार्थ आहेत.

(३), (४) व (५) प्राधिकरणाच्या ताब्यातील ३१ इमारतींमध्ये (विंग्स) विविध प्रकल्पाने बाधित झालेल्या सुमारे २,६०० प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. स्थानिक रहिवाश्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने, प्राधिकरणाद्वारे इमारतींतील रहिवाश्यांची सह.गृ.नि.संस्था नोंदणीकृत झाल्यावर इमारतीची एकवेळची दुरुस्तीची, विशेषत: गळतीच्या कामांची, उदवाहनांची कामे करण्यात येतात. वसाहतीसाठी सह.गृ.नि. संस्थांचे असोसिएशन नोंदणीकृत झाल्यावर वसाहतीतील पायाभूत सुविधांची एकवेळची श्रेणीवाढ करण्यात येते. नटवर पारेख इंडियन

ऑईल कपांऊड, गोवंडी येथील २९ इमारतीमध्ये (२९ विंग्ज) प्राधिकरणामार्फत प्रकल्पग्रस्तांना वितरीत झालेल्या सदनिकांची व इमारतींची दुरूस्ती कामे जसे की, नहाणीघर, शौचालय, स्वयंपाकगृह, गच्ची व गच्चीवरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या इत्यादींची गळती प्रतिबंधक कामे, इमारतीच्या बाहय भागातील भिंतीवरील गळतीबाधीत मल:निस्सारण वाहिनी बदलणे, इमारतीच्या बाहय भिंतीची जलप्रतिबंधक कामे व इतर अनुषंगीक कामे तसेच मल:निस्सारण वाहिनीची कामे व दोन इमारतीमधील काँक्रिट पेव्हमेंटची कामे बाहय निर्गमन धोरणा (Exit Action Plan) नुसार एक वेळ करण्यात आलेली आहेत. तसेच, तेथील मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहत इमारतींच्या अस्तित्वातील दोन भुमीगत पिण्याच्या पाण्याच्या साठवण टाक्यांची उंची वाढवून त्याजागी एच.डी.पी.ई. (HDPE) प्रकारच्या पिण्याच्या पाण्याच्या साठवण टाक्या बसविण्याचे कामेसुध्दा करण्यात आली आहेत.

---

**महाराष्ट्राचे संतकवी रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे अहमदनगर येथील स्मृतिस्थळाचा विकास करण्याबाबत**

**(४२) १४०१०२ (१५-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे शेवटचे संतकवी आणि फुला-मुलांचे कवी अशी ख्याती असलेले रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे अहमदनगरमधील स्मृतिस्थळ अनेक वर्षापासून दुर्लक्षित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात एकमेव असलेल्या या स्मृतिस्थळाचा विकास व्हावा अशी मागणी अभ्यासकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू स्मृतिस्थळाचा विकास करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे स्मृतिस्थळ अहमदनगर येथे स्थित आहे. तथापि, सदर स्मृतिस्थळाची जागा ख्रिश्चन समाजाच्या अधिकार क्षेत्रात असून, सदर स्मृतिस्थळ हे स्मशानभूमीत आहे.

(२) व (३) सदर स्मृतिस्थळाचा विकास करण्यासंदर्भात महानगरपालिकेस कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नाही, असे अहमदनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील पाटीलनगर येथे एसटीपी प्लान्टच्या जागेवरील १५ वृक्षांची तोड केल्याबबत**

**(४३) १४०१०६ (१३-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील पाटीलनगर येथे ३ एकर जागेवर बंद अवस्थेत असलेल्या एसटीपी प्लान्टच्या जागेवरील क्रीडांगण व उद्यान विकसित करण्याचे काम सुरू असून या ठिकाणी असलेल्या सुमारे १५ झाडांची कत्तल झाल्याने गुन्हे दाखल करण्याची मागणी अंबड पोलीस ठाण्यात करण्यात आल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्यान विभागाच्या अधिकारी व ठेकेदाराच्या संगनमताने वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषींवर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१) होय.

• सदर ठिकाणी दि.०६.५.२०१९ रोजी १५ वृक्ष तोडण्यात आल्याचे आढळून आले आहे.

• याबाबत महानगरपालिकेच्या उद्यान निरीक्षक यांचेमार्फत दोन आरोपींविरुध्द महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम २१(१) प्रमाणे अंबड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

• त्याचप्रमाणे पोलीसांकडून संबंधित आरोपींना अटक करण्यात आली असून, घटनास्थळी असलेले वाहन लाकडांसह ताब्यात घेण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी अंबड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झालेला असून, पोलीस विभागामार्फत पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेत दोन हजार जागा रिक्त असल्याबाबत**

**(४४) १४१००१ (१३-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेत एकूण मंजूर पदांची संख्या सात हजार इतकी असून त्यातील दोन हजार जागा रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्तीमुळे कर्मचा-यांची संख्या कमी होत असून अधिका-यांच्या जागाही मोठया प्रमाणात रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकारी/कर्मचा-यांच्या जागा रिक्त असल्याने एका अधिका-याकडे सात ते आठ पदांचा प्रभारी कार्यभार सोपविला असल्याने त्याचा नागरिकांच्या कामावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त अधिकारी/कर्मचा-यांच्या जागा रिक्त असण्याची कारणे काय आहेत व ती भरण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर गट-अ ते गट-ड मध्ये एकूण ७०८२ पदे मंजुर आहेत. त्यापैकी ४९४६ पदे कार्यरत असून, २१३६ पदे रिक्त आहेत.

(२) होय.

(३) नाही.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी अंतर्गत व्यवस्था म्हणून कार्यरत अधिकाऱ्यांकडे प्रभारी कार्यभार देण्यात आलेला आहे. यामुळे नागरिकांना द्यावयाच्या सेवा सुविधा कालमर्यादेत पुरविण्यात येतात.

(४) • दि.०४.०५.२००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५% मर्यादेत असणे आवश्यक आहे.

• नाशिक महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्याने, महानगरपालिकेस पदभरती करता आली नाही.

• तथापि, गट-अ व गट-ब मधील पदांवर शासन सेवेतील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

• तसेच, सन २०१८-१९ मध्ये महानगरपालिकेचा आस्थापना खर्च हा ३०.७३% इतका मर्यादेत आलेला असल्याने, अत्यावश्यक सेवेतील अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याचे प्रस्तावित आहे.

---

## शिवडी ते न्हावा शेवा दरम्यान उभारण्यात येणा-या मुंबई ट्रान्सहार्बर लिंकवरुन प्रवासासाठी वाहनांना दयावा लागणारा टोल ठरविण्याबाबत

**(४५) १४१०२८ (१३-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी ते न्हावा शेवा दरम्यान उभारण्यात येणा-या मुंबई ट्रान्सहार्बर लिंकवरुन प्रवासासाठी वाहनांना टोल दयावा लागणार असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रान्स हार्बर लिंकरवर टोल वसुलीचे काम खासगी संस्थेला दिले जाणार आहे परंतू अदयाप त्यावर अंतिम निर्णय घ्यायचा असल्याचे एमएमआरडीच्या वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले असून एमएमआरडीएने सन २०१८ मध्ये शासनाला या प्रकल्पाचा अहवाल दिला होता त्यामध्ये टोल किती लावायचा याचीही माहिती देण्यात आली होती परंतु अद्यापही ही रक्कम ठरविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे काम खासगी संस्थेला दिले जाणार असुन या खाजगी कंपन्या टोलची रक्कम सतत वाढवित असतात त्यामुळे अनेकदा वाद निर्माण होतात त्यामुळे या प्रकरणी शासनाने या सर्व बाबींचा सर्वकष विचार करुन कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१९) :** (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई पारबंदर प्रकल्पाचे बांधकाम जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका) या संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या कर्जाच्या सहाय्याने करण्यात येत आहे.प्रकल्पास कर्ज देण्यास मान्य करण्यापूर्वी जपान इंटरनॅशनल कॉऑपरेशन एजन्सीने ऑगस्ट २०१६ मध्ये तयार केलेल्या प्रकल्पाच्या अंतिम अहवालामध्ये (Final Report) प्रकल्पाकरीता पथकर आकारण्याबाबत शिफारस केली होती. सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम एमएमआरडीएमार्फत प्रगतीपथावर असून सदर प्रकल्प सन २०२२ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर पुलावरुन वाहतूक सुरु करण्यापूर्वी पथकर आकारण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळमनुरी (जि.हिंगोली) येथील उद्यानाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(४६) १४१११३६ (१३-०७-२०१९). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथे गत तीन वर्षापासून उद्यानाचे काम सुरु असून ते अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे काम प्रशानाच्या दुर्लक्षामुळे अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून यामध्ये कंत्राटदाराने रकमेचा अपहार केल्याच्याही तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर कंत्राटदारावर व त्याच्याशी संगनमत करणाऱ्या नगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही.
उद्यानाचे काम पुर्ण झालेले असून, फक्त खेळणी बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
• उद्यानाचे काम नगरपरिषद अभियंता (स्थापत्य) यांच्या देखरेखीखाली करुन घेण्यात आले आहे.

• सदर कामाचे थर्ड पार्टी ऑडीट करण्यात आले असून, काम चांगल्या प्रकारचे झाले असल्याबाबत प्राप्त ऑडीट रिपोर्टनुसार संबंधित कंत्राटदारास देयके देण्यात आली आहेत.
• तसेच सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारचा अपहार झालेला नसून, तक्रारी देखील प्राप्त झालेल्या नसल्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपात्र झोपडपट्टीवासियांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे देण्यात येणार असल्याबाबत**

**(४७) १४११५५ (०८-०७-२०१९). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ पर्यंतच्या अपात्र झोपडपट्टीवासियांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे देण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २००० ते १ जानेवारी, २०११ पर्यंतच्या अपात्र झोपडपट्टीधारकांना एसआरए अंतर्गत घरे मिळतील पण ती सशुल्क असतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई, ठाणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील (एसआरए) सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांच्या सदनिकेची किंमत निश्चित करण्याचे अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना देण्याचा निर्णय गृहनिर्माण विभागाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनेंतर्गत दिली जाणारी घरे किती कालावधीत तयार होणार आहेत व कधीपर्यंत झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन होणार आहे ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०७-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

दि.०७.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये पुनर्वसन सदनिकेची किंमत ठरविण्यासाठीचे निकष विहित करण्यात आले असून या निकषानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून किंमत निश्चित केली जाईल.

(४) विविध झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून पात्र झोपडपट्टीधारकांना द्यावयाच्या सदनिकां व्यतिरिक्त तयार होणाऱ्या अधिकच्या पुनर्वसन सदनिका ह्या सशुल्क पुनर्वसनास पात्र असणाऱ्या झोपडीधारकांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून अशा प्रकारे सशुल्क पुनर्वसन सदनिका तयार होणार असल्याने त्याचा निश्चित कालावधी नमूद करणे शक्य नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हदीतील श्रीमलंग रोड ने चिंचपाडा या रस्त्याच्या कामात बाधित घरांच्या पुनर्वसनाबाबत**

**(४८) १४१११७८ (१३-०७-२०१९). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हदीतील श्रीमलंग रोड ने चिंचपाडा या १०० फुटी रोडला जोडणाऱ्या चिंचपाडा रोड येथे रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या माधव अपार्टमेंट ही अधिकृत इमारत बाधित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नियोजित असलेले मुख्य मार्ग व मुख्य प्रकल्पामध्ये बाधित असलेल्या घरांचे पुनर्वसन होत नसल्यामुळे संबधित प्रकल्प पूर्णत्वास नेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित सर्व प्रकल्प पुर्णत्वास नेण्याकरिता शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१९) :** (१) • कल्याण पूर्व येथील हाजीमलंग रस्ता ते चिंचपाडा या ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यामध्ये मौजे काटेमानीवली स. नं. ४२ हिस्सा नं. ३/२/४ बपै, प्लॉट नं. १९ या भूखंडावरील माधव अपार्टमेंट ही अधिकृत इमारत पुर्णत: बाधीत होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५४, दि. २३.०३.२०१८ अन्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कामात बाधीत होणाऱ्या व विस्थापित होणाऱ्या नागरिकांचे जलदगतीने पुनर्वसन होणेकरीता नवीन धोरण निश्चित केलेले आहे.

• माधव अपार्टमेंट मौजे काटेमानेवली येथील इमारतीस सन १९९३ मध्ये बांधकाम परवानगी दिली असून सन १९९५ मध्ये बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नवीन धोरणानुसार सन १९९६ पूर्वीचे शासकीय, महापालिकेच्या किंवा खाजगी जागेतील बांधकाम, विकास कामात बाधीत होत असल्यास किंवा यापुर्वी बाधीत झालेले असल्यास अशा सदनिकाधारकांस किंवा दुकान गाळे धारकास विनामुल्य पुनर्वसन करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

• सदर तरतूदीच्या अनुषंगाने इमारतीचे व्हॅल्यूएशन सहाय्यक, संचालक नगररचना यांचे मार्फत करून प्रभागक्षेत्र अधिकारी हे छाननी करून प्रस्ताव पुनर्वसन समितीसमोर ठेवतील व आवश्यकतेनुसार महासभेची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूरबाजार नगरपरिषदेच्या (जि.अमरावती) नगरसेविका यांच्याविरुद्ध कारवाई करणेबाबत**

**(४९) १४१२८४ (१३-०७-२०१९). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार नगरपरिषदेतील (जि.अमरावती) नगरसेविका श्रीमती अनुराधा रवींद्र पवार यांच्याविरुद्ध नगरपालिका अधिनियम, १९६५ च्या कलम ४२ अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव गत ७ वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका नगरसेविकेवर कारवाईचा प्रस्ताव ७ वर्षे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर नगरसेविकेविरुद्धच्या कारवाईचा प्रस्ताव तातडीने मंजूर व्हावा यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१९) :** (१) श्रीम.अनुराधा रविंद्र पवार, तत्कालीन सदस्या, चांदूर बाजार नगरपरिषद त्यांनी सन २००५ ते २०१० या कालावधीत केलेल्या अनियमिततांसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४२ अंतर्गत कार्यवाही करण्याबाबतची तक्रार श्री.शेख नजीर यांनी दि.२४.०३.२०११ च्या अर्जान्वये शासनाकडे केली होती.

(२) ते (५) • तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून दि.२०.०८.२०११ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता.

• सदरचा अहवाल दि.१९.०९.२०११ च्या पत्रान्वये प्राप्त झाला होता. परंतु याप्रकरणी कार्यवाही करण्यासाठी काही मुद्यांबाबतची अतिरिक्त माहिती आवश्यक असल्याने, ती दि.१३.०१.२०१२ च्या शासन पत्रान्वये व नंतर स्मरणपत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून मागविण्यात आली होती. सदर माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तत्पुर्वीच नोव्हेंबर, २०११ रोजी श्रीमती पवार यांच्या सदस्यत्वाचा पदावधी संपला आहे.

• श्रीम.अनुराधा पवार आता चांदूरबाजार नगरपरिषदेच्या सदस्या नाहीत.

• उक्त अधिनियमाच्या कलम ४२ मधील तरतूद पाहिल्यास पालिका सदस्यांना त्यांच्या चालू असलेल्या पदावधीमध्ये किंवा निकटपूर्ववर्ती पदावधीमध्ये त्यांनी केलेल्या गैरवर्तणूकीबद्दल पदावरुन दूर करता येते.

• चांदूरबाजार नगरपरिषदेचा चालू पदावधीचा कालावधी सन २०१६-२१ असा आहे. सबब त्याचा निकटपूर्ववर्ती पदावधी सन २०११-१६ हा ठरतो.

• या प्रकरणातील गैरवर्तणूक त्याच्याही पूर्वीच्या पदावधीतील म्हणजेच सन २००६-२०१० ची असल्याने व श्रीमती पवार या आता सदस्य पदावर कार्यरत नसल्याने त्यांच्याविरुद्ध कलम ४२ खाली कार्यवाही करुन त्यांना पदावरुन दूर सारण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

___________

**नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील बाळासाहेब ठाकरे उद्यानात महिला व मुलांसह नागरीकांना काही काळ बंदिस्त ठेवण्यात आल्याबाबत**

**(५०) १४२५५० (१३-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील बाळासाहेब ठाकरे उद्यानात दिनांक २९ मे, २०१९ रोजी महिला व मुलांसह नागरीकांना १ तास ३० मिनिटे बंदिस्त ठेवण्यात आलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांच्या मदतीने त्यांची सुटका करण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई कारण्यात आली व कारवाईचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

• नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेचे मा.बाळासाहेब ठाकरे उद्यान सेवा चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक या संस्थेस दि.१३.०६.२०17 रोजीच्या करारनाम्याव्दारे देखभाल व दुरुस्ती करीता दहा वर्षांच्या मुदतीसाठी देण्यात आले आहे.

• सदर उद्यानात दि.२८.०५.२०१९ रोजी एका कुटूंबातील सदस्य व मुले रात्री ८ वाजेपर्यंत बसून होते.

• उद्यानातील सुरक्षारक्षक यांनी ८ वाजता गेट बंद करण्याची वेळ झालेली असल्याने त्यांना जाण्याबाबत सूचना दिली.

• मात्र सदर कुटूंबिय व मुले बसुन राहिल्याने, त्यांना आपण जाल तेंव्हा गेट उघडून देतो, असे सांगुन सुरक्षा रक्षकाने उद्यानाचे गेट बंद केले होते.

• त्यानंतर संबंधित कुटूंबातील व्यक्ती तेथे आल्यानंतर त्याने त्यांच्या कुटूंबियांस बंदिस्त केल्याची तक्रार करुन, पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला.

• संबंधित तक्रारदाराने पोलीस येईपर्यंत गेट उघडण्यास मज्जाव केल्याने, पोलीस आल्यानंतर गेट उघडण्यात आले.

(३) सदर प्रकरणी संबंधित तक्रारदाराने सेवा चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेचे वरिष्ठ अधिकारी व दोन सुरक्षारक्षक यांचेविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**

**मुंबई.**

**सचिव**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.